# APPENDICES

| | |
|---|---|
| APPENDX A | Certificate of Azad College of Education, Satara |
| APPENDIX B | Certificate of College of Education, Phaltan. Chapter Zerox |
| APPENDIX C | Marksheet, Name of Students. |
| APPENDIX D | Pre-Test |
| APPENDIX E | i-Pod Programme with Content Photo copy |
| APPENDIX F | Inventory |
| APPENDIX G | Post-Test |

"Education through self-help is our motto" - Karmaveer
RAYAT SHIKSHAN SANSTHA'S
**AZAD COLLEGE OF EDUCATION,**
**SATARA - 415 001 (Maharashtra - India)**
(Affiliated to Shivaji University, Kolhapur)
**Founder of the Sanstha & College**
**Padmabhushan Dr. Karmaveer Bhaurao Patil.** *D.Litt*
**Principal Dr. M. L. Jadhav, M.A., M.Ed., M.Phil., Ph.D.**

Estd : 1955
B++ Accreditation

☎ Office - 231257, Fax - 02162 - 231257, Resi. 238106 E-mail - azadcollegesatara@gmail.com

Ref. No. /20 - 1 Date : / /20

**To ,**
Principal
College of Education,Phaltan.

**Sub:- Permission for collecting reqired Data for Research.**

Respected Sir,

With mentioned above subject that Mr. SHINDE DATTATRAY BHUJANGRAO is doing Research work for the M.Phil course on "A Study of ipod Technology and its effect on students Interest in study" Please give him Permission to collect the required data for his Research work.

Thanking You.

Principal
Azad College of Education,
Satara.

AZAD COLLEGE OF EDUCATION SATARA

## Marksheet of Content Test

| Roll No. | Marks | Roll No. | Marks |
|---|---|---|---|
| 1 | 12 | 26 | 11 |
| 2 | 14 | 27 | 04 |
| 3 | 15 | 28 | 12 |
| 4 | 15 | 29 | A |
| 5 | 15 | 30 | 14 |
| 6 | 12 | 31 | 15 |
| 7 | 16 | 32 | 13 |
| 8 | 17 | 33 | 15 |
| 9 | 15 | 34 | 14 |
| 10 | 16 | 35 | 12 |
| 11 | 17 | 36 | 15 |
| 12 | 16 | 37 | 15 |
| 13 | 17 | 38 | 14 |
| 14 | 16 | 39 | 15 |
| 15 | 17 | 40 | 9 |
| 16 | 16 | 41 | 14 |
| 17 | 15 | 42 | 16 |
| 18 | 15 | 43 | 14 |
| 19 | 14 | 44 | 14 |
| 20 | 14 | 45 | 17 |
| 21 | 15 | 46 | 11 |
| 22 | 16 | 47 | 13 |
| 23 | 16 | 48 | 15 |
| 24 | 13 | 49 | 15 |
| 25 | 14 | 50 | 12 |

| Sr.No. | Name of students |
|---|---|
| 1. | Bichukale Dattatrya B. |
| 2. | Mane Achut R. |
| 3. | Nimbalkar Pravin J. |
| 4. | Sonwalkar Shivaji S. |
| 5. | Waghmore Hanumant B. |
| 6. | Bhosale Haribhau L. |
| 7. | Mane Ganesh R. |
| 8. | Suryavanshi Satish S. |
| 9. | Nikam S.S. |
| 10. | Daphal H.B. |
| 11. | Kale Shobha J. |
| 12. | Karche Lalita G. |
| 13. | Mulik Vaishali B. |
| 14. | Sonwalkar Rekha P. |
| 15. | Jadhav Priyanka B. |
| 16. | Nale Shilpa B. |
| 17. | Mane Monika U. |
| 18. | Mohite Anuradha M. |
| 19. | Patil Aruna D. |
| 20. | Kutwal Ashwini D. |
| 21. | Nanaware Ashivni S. |
| 22. | Nanaware Pratibha S. |
| 23. | Sawant Swati M. |
| 24. | Kharat Swati H. |
| 25. | Jagdale Anuradha L. |

# घटक चाचणी

वेळ – ४५ मिनिटे (उत्तर चाचणी) गुण–२५

**प्र.१ ला. अ) रिकाम्या जागा भरा.** गुण –३

१) व्यक्तिच्या सामान्यत: ..................... वर्षापर्यंतचा कालखंड हा वाढ व विकासाचा काल असतो.

(१२ वर्षे, १८ वर्षे, १६ वर्षे)

२) कुमारावस्थेतील महत्त्वाची समस्या म्हणजे ............... समस्या होय.

(लैंगिक, बेकारी, बौध्दिक )

३) कुमारांच्या लैंगिक समस्या निराकरणात ...................... महत्त्वाची भूमिका पार पाडू शकतात.

(पालक, शिक्षक, मित्र)

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.** गुण–२

१) वाढ व विकासाची व्याख्या लिहा.

२) मार्गदर्शन व समुपदेशनाचा अंतीम हेतू काय असतो?

**प्र.२ रा. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.** गुण–१०

१) शैशवावस्थेतील (३ ते ५ वर्षे) मुलांना वाचन लेखन का शिकवू नये.

२) किशोरावस्थेतील विद्यार्थ्यांच्या सामाजिक विकासासाठी उपक्रम सूचवा.

३) कुमारावस्थेतील विद्यार्थ्यांचा भावनिक व नैतिक विकास कसा कराल.

४) वाढ व विकासातील फरकाचे ४ मुद्दे उदाहरणासह लिहा.

५) अनुवंश म्हणजे काय? मुलगा किंवा मुलगी होणे सर्वस्वी कोणावर अवलंबून असते?

**प्र.३ रा. खालील प्रश्नांची उत्तरे लिहा (फक्त २)** गुण–१०

१) कुमारावस्थेतील विद्यार्थ्यांना येणाऱ्या गरजा व समस्यांची चर्चा करा?

२) १० वी, १२ वी नंतर 'करिअर गाईडन्स' करण्यासाठी तुम्ही कोणत्या गोष्टींचा विचार कराल.

३) कुमारावस्थेतील अध्ययनार्थींना सल्ला व मार्गदर्शन करण्यामधील शिक्षकाची भूमिका विशद करा.

## वाढ व विकास यातील फरक

वाढ व विकास या संज्ञा सामान्यत: समान अर्थाने वापरल्या जात असल्या तरी त्यांच्यात भिन्नता आहे. वाढ (Growth) ही संज्ञा व्यक्तीच्या शारीरिक वाढीशी निगडित आहे. वाढ म्हणजे परिमाणात्मक असा बदल होय. शरीराचे वजन व आकारमान वाढते ते आपणास मोजता येते. 'वाढ' ही उंची, वजन, छाती यांच्याशी निगडित असते. वाढ ही आहार आणि पोषण ह्यामुळे घडते. शरीरातील हृदयाचे वजन वाढते, हाडांची लांबी वाढते ह्या सर्व गोष्टींचा समावेश 'वाढ' या संज्ञेत होतो. 'वाढ' ही एका विशिष्ट अवस्थेला येऊन स्थिर होते. शारीरिक वाढीबरोबर मानसिक वाढ झालेली आपण पाहतो. मेंदूची वाढ झाली की वेदनक्षमता वाढते, स्मृतिक्षमता वाढलेली दिसते. 'वाढ' हा शब्द सामान्यपणे आकाराने मोठे होणे व वजनाने वाढणे ह्या अर्थाने वापरला जातो. **फ्रँक** या मानसशास्त्रज्ञाच्या मते, **'पेशीयुक्त गुणाकार म्हणजे वाढ होय.'**

'विकास' (Development) ही संज्ञा 'वाढ' ह्या संज्ञेपेक्षा अधिक व्यापक असून तिच्यात शारीरिक वाढीबरोबरच मानसिक व बौद्धिक उन्नतीचा समावेश अपेक्षित असतो.

थोडक्यात, विकास म्हणजे वाढ आणि बदल यांनी निर्माण केलेल्या घटकांचे संघटन होय. मानवी प्राणी आयुष्यभर बदलत असतो. त्याचा सतत विकास होत असतो. विकासाची **संकल्पना मांडताना हरलॉक** यांनी असे म्हटले आहे की, 'पक्वता व अनुभव यांच्या परिणामाने होणारे क्रमबद्ध व प्रगतिकारक बदल म्हणजे विकास होय.' हरलॉकच्या या व्याख्येचा विचार केला तर आपण असे म्हणू शकतो की विकास हा गुणात्मक व क्रमबद्ध असतो. प्रत्येक व्यक्तीचा विकास सारखा नसतो, विकासाचा परिणाम सर्व घटकांवर होत असतो.

**पॉल मुसेन** याच्या मते, 'एखाद्या व्यक्तीच्या शरीराच्या व मज्जासंस्थेच्या रचनेत, वर्तनात व गुणवैशिष्ट्यांत व्यवस्थित पद्धतीने होणारे टिकाऊ स्वरूपाचे बदल म्हणजे विकास होय.'

## विकास प्रक्रियेची तत्त्वे (Principles of Development)

**१. विकास सातत्याने चालणारी प्रक्रिया :** विकास ही सातत्याने चालणारी प्रक्रिया आहे. ती कधीही अर्ध्यावर थांबत नाही. ही प्रक्रिया सतत पण कमी-अधिक गतीने चालू राहते. व्यक्तीतील बौद्धिक, मानसिक, सामाजिक व नैतिक विकासातील बदल जाणवत राहतात. प्रत्येक क्षणी व्यक्तीला नवा अनुभव येत राहतो. अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. विचार, तर्क करावा लागतो. त्या अनुभवातून व्यक्तीचा बौद्धिक विकास होतो.

**२. विकासात निश्चितता असते :** प्रत्येक विकास अवस्थेमध्ये निश्चितता असते. व्यक्तीचा विकास हा पुढीलप्रमाणे असतो असे त्यानुसार तो विकास व्हावा लागतो. मानसशास्त्रज्ञांचे स्पष्टीकरण आहे.

**(अ) डोक्याकडून पायाच्या दिशेने :** शारीरिक विकासात प्रथम डोक्याची वाढ, नंतर धडाचा भाग व नंतर पायाचा भाग अशा क्रमाने विकास घडून येतो. मूल सुरुवातीला [illegible], रांगणे, उभे राहणे, चालणे अशा क्रमाने या क्रिया घडून येतात. यावरून आपल्याला कल्पना येते की व्यक्तीचा विकास डोक्याकडून पायाकडे होत असतो.

**(ब) विकासाचा क्रम मध्यभागाकडून टोकाकडे :** शरीराच्या मधल्या भागाचा विकास प्रथम आणि लांबवरच्या भागाचा विकास नंतर होतो. हाताचा विकास आधी आणि बोटांचा विकास नंतर होतो. शारीरिक विकासाच्या संदर्भात विकासाचा क्रम असाच राहतो.

**(क) विशिष्ट क्रमाने विकास :** मुलांच्या विकासाचे निरीक्षण केले तर असे आढळून येते की ते पहिल्यांदा पालथे पडते, नंतर रांगते, उभे राहते व त्यानंतर चालायला शिकते. कुशीवर वळण्यापासून क्रमाक्रमाने मुलाचा विशिष्ट क्रमाने विकास होत असतो.

**३. विकासाची गती भिन्न भिन्न असते :** विकास ही सातत्याने चालणारी प्रक्रिया आहे; पण त्या विकास प्रक्रियेत वेगळेपण असते. शरीराच्या वेगवेगळ्या भागाचा विकास वेगवेगळ्या गतीने होत असतो. शरीरातील काही भागांचा विकास अपेक्षेपेक्षा लवकर होतो. शरीराच्या वेगवेगळ्या भागांची रचना वेगवेगळी असते. त्यामुळे निरनिराळ्या भागांचा विकाससुद्धा भिन्न भिन्न गतीनुसार होत असतो. किशोरावस्थेपर्यंत नाक, हात, पाय ह्यांचा विकास पूर्ण होतो. खांदा, मानेखालचा भाग, धडाखालचा भाग अपेक्षेपेक्षा उशिरा विकसित होतो. शारीरिक विकासाप्रमाणेच मानसिक विकासाची गती भिन्न भिन्न असते, ती अध्ययनावरून समजते. सर्जनात्मक कल्पना बाल्यावस्थेत प्रभावशाली असतात. त्याची तीव्र गती असते म्हणजेच प्रत्येकाचा विकास भिन्न भिन्न गतीने होत असतो.

**४. विकासाची दिशा :** शैशवावस्थेतील मुलांचे विश्व स्वत:पुरते मर्यादित असते, ते स्वयंकेंद्री असते. मुले मोठी होत गेल्यावर त्यांना इतरांची जाणीव होते. तोपर्यंत स्वत:च्या विश्वातच ती रमत असतात. इतरांचे भान त्यांना नसते. नंतरच्या कालावधीत ती स्वत:वर बंधने घालायला लागतात. मनावर नियंत्रण आणतात, माणसांच्या वर्तनाचा हा पाया असतो. विकासाची दिशा अशा पद्धतीने निर्माण होते.

**५. विकास प्रक्रिया परस्परावलंबी असते :** मनुष्य हा समाजशील प्राणी आहे. तो समाजाशिवाय जगू शकत नाही. बालकाचा जसजसा शारीरिक विकास होतो तसतसे ते समाजात मिसळायला लागते. शारीरिक व मानसिक हे दोन्ही घटक एकमेकांशी संबंधित असतात. व्यक्ती ज्या कुटुंबात, समाजात, सामाजिक वातावरणात राहते त्या घटकांचा त्या बालकावर परिणाम होत असतो. समाजातील आचार-विचारांचा प्रभाव व्यक्तीवर होत असतो, त्यामुळेच व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व बरेवाईट बनते. अशा प्रकारे विकास प्रक्रिया ही एकमेकांवर अवलंबून असते.

**६. विकास संकलित स्वरूपात असतो :** व्यक्तीचा विकास होत असताना तो संकलित स्वरूपात होतो. विविध प्रकारच्या हालचाली करीत असताना त्याच्या चेतासंस्था व स्नायुसंस्था यांच्या कारक कौशल्यातून हालचाल होत असते. रांगण्यापूर्वीच्या हालचाली, बोलण्यापूर्वीच्या हालचाली ह्या संकलित स्वरूपाच्या असतात. दृष्टीचा, श्रवणाचा, उपयोग

पुढच्या कृतीच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असतो. ह्या सर्व क्रियांचे संघटन करणे आवश्यक असते.

**७. विकास प्रक्रिया व्यक्तिभिन्नतेनुसार वेगवेगळी असते :** प्रत्येक व्यक्ती एक दुसरीपेक्षा वेगळी असते. प्रत्येकामध्ये व्यक्तिभिन्नता आढळून येते. उदा. वय, आर्थिक स्थिती, सामाजिक स्थान, लिंग, जात, धर्म इत्यादी. प्रत्येकाचे व्यक्तिमत्त्व एका विशिष्ट प्रकारचे असते. विकासाचा वेग ज्याच्या त्याच्या व्यक्तिमत्त्वानुसार कमी-जास्त असतो. सर्वांचा विकास एकाच गतीने, एकाच प्रमाणात होत नाही. एकाच माता-पित्याची दोन बालके परंतु त्यांचा विकाससुद्धा व्यक्तिभिन्नतेनुसार होतो. परिस्थिती व वातावरणाचा परिणाम व्यक्तीवर होत असतो. परिणामी विकासातही भिन्नता येते.

## (ब) विकासाच्या विविध अवस्था व वैशिष्ट्ये
## (Stages of Development and It's Characteristics)

### विकासाच्या विविध अवस्था

विकास ही सातत्याने चालणारी आणि गुंतागुंतीची प्रक्रिया आहे. जन्मापासून मृत्यूपर्यंत व्यक्तीचा विकास सतत होत असतो. विकासाची प्रक्रिया गर्भधारणेपासून सुरू होते व माणसाच्या अंतापर्यंत ती चालतच राहते. ह्या विकास प्रक्रियेत गर्भावस्था, नवजात अवस्था, शैशवावस्था, बाल्यावस्था, कुमारावस्था, प्रौढावस्था आणि वृद्धावस्था अशा अवस्था आहेत. यापैकी शैक्षणिकदृष्ट्या कुमारावस्थेपर्यंतच्या अवस्थांचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो.

विकासाच्या विविध अवस्थांचा विचार पुढीलप्रमाणे -

### गर्भावस्था (Prenatal Period )

पित्याकडून आलेली रेतपेशी व मातेकडून आलेली अंडपेशी ह्यांच्या मिलाफातून जीवाची निर्मिती होते. शरीरपेशीच्या मध्यावरील केंद्रामध्ये बीजमणिमालांच्या (Chromosomes) २३ जोड्या असतात. रेतपेशींची २३ रंगसूत्रे आणि स्त्री बीजपेशीची २३ रंगसूत्रे असतात. पेशीचे मिलन झाल्यावर रंगसूत्रे विभागून त्यांच्या २३ जोड्या बनतात. इथूनच विकासाची प्रक्रिया २४ ते ३६ तासांत सुरू होते. गर्भधारणेपासून जन्मापर्यंतचा विकास तीन स्तरांवर दिसून येतो.

(अ) जंतू अवस्था अथवा बीजावस्था (Period of Germinal)

(ब) भ्रूणावस्था अथवा पिंडावस्था (Period of Embryo)

(क) गर्भावस्था (Period of Fetus)

**(अ) जंतू अवस्था अथवा बीजावस्था :** गर्भधारणेपासून दोन आठवड्यांचा हा कालखंड होय. ह्या कालखंडात फलितांड अंड्याप्रमाणे असते. ते पोषकद्रव्ये आईकडून घेते. ... फलितांडाचे दोन पेशींचे चार, चाराचे आठ ह्याप्रमाणे विभाजन होते. यापासून ... पोषण करणाऱ्या, संगोपन करणाऱ्या

साहाय्यकारी पेशींचा पडदा तयार होतो. आतील पेशीपासून गर्भाची वाढ होण्यास सुरुवात होते. १० दिवसांनी गर्भ गर्भाशयाच्या कडेला रुजतो. गर्भाशयात तात्पुरता अवयव तयार होतो, त्याला 'जरायु' (Placenta) असे म्हणतात. ह्या अवयवातून नाळ वाढते. गर्भाभोवती नाळेचे वेटोळे असते. त्यातून पोषक घटक मातेच्या रक्तातून बाळाला मिळण्यास सुरुवात होते.

**(ब) भ्रूणावस्था अथवा पिंडावस्था :** दोन आठवडे ते आठ आठवड्याचा हा कालखंड होय. भ्रूणाची वाढ ह्या कालावधीत झपाट्याने होत असते. ह्या कालखंडाच्या शेवटी गर्भ मानवी व्यक्ती आहे हे समजते. या कालखंडात पेशीपुंजाचे तीन स्तर तयार होतात. त्यांना 'जनक स्तर' असे म्हणतात.

***बाह्य स्तर*** (The Ectoderm) : बाह्य स्तराच्या पेशीतून त्वचा, केस, दातांचे भाग, नखे, ज्ञानेंद्रियांच्या पेशी विकसित होतात.

***मध्य स्तर*** (The Mesoderm) : यापासून आतील त्वचेचे आवरण तयार होते. स्नायू, हाडांचा सांगाडा, अभिसरण इंद्रिये आणि उत्सर्गेंद्रिये तयार होतात.

***अंतःस्तर*** (The Endoderm) : अंतःस्तरातील पेशीपासून पचनेंद्रिये, श्रवणनलिका, श्वासनलिका, फुफ्फुसे, यकृत, स्वादुपिंड, लालोत्पादक पिंड, थायरॉइड, थायमस ग्रंथी तयार होत असतात.

ह्या अवस्थेत शरीराचे सर्व अवयव तयार होत असतात. भ्रूणाची वाढ डोक्यापासून पायाकडे होते. स्नायूकडून अवयवाच्या टोकाकडे होते. गर्भाच्या संरक्षणासाठी गर्भाभोवती पाण्याचे आवरण तयार झालेले असते. गर्भाचे संरक्षण करणे हे पाण्याचे कार्य होय.

**(क) गर्भावस्था :** आठव्या आठवड्यापासून जन्मापर्यंतचा हा कालावधी असतो. भ्रूणावस्थेत ज्या अवयवांची निर्मिती झालेली असते त्यांची वाढ ह्या अवस्थेत होत असते. ह्या अवस्थेत गर्भावस्थेतील बालकाचे हृदय, फुफ्फुसे कार्य करू लागतात. अशा रीतीने गर्भाशयात बालकाची वाढ नऊ महिन्यांपर्यंत होत असते.

### जन्मोत्तर अवस्था

**१. नवजात अवस्था (Neonatal)**

ही अवस्था जन्मापासून १४ दिवसांपर्यंत समजली जाते. या काळात बालकाचा विशेष विकास होत नाही. कारण एकदम नवीन वातावरणाशी समायोजन करण्यात त्याची कार्यशक्ती खर्च होते. परिणामतः त्याचे वजन किंचित कमी होते. हळूहळू समायोजन होऊ लागताच वजन पूर्ववत होते. गर्भावस्थेतील तपमानापेक्षा निराळ्या तपमानाशी आता त्याला समायोजन करावे लागते. तसेच स्वतंत्रपणे श्वासोच्छ्वासाची क्रिया करून प्राणवायू मिळवावा लागतो. पूर्वी त्याला तो आईच्या रक्तातून मिळत असे. तोंडाने अन्नद्रव्य ग्रहण करणे व शरीरातील अनावश्यक द्रव्ये उत्सर्जक इंद्रियांद्वारा बाहेर टाकण्याचे समायोजन नवजात शिशूला करावे लागते.

**२. शैशवावस्था (Infancy)**

ही जन्मोत्तर अवस्था दोन आठवडे ते पाच वर्षांपर्यंत असते. बालक जन्मपूर्व अवस्थेत

आईवर अवलंबून असते. जन्मानंतर ह्या पृथ्वीतलावर आल्यावर त्याच्या श्वासोच्छ्वास, पचन या क्रियांना प्रारंभ होतो. प्रकाश, ध्वनी, क्लेश ह्या उद्दीपकांना ते प्रतिसाद देते. सुखदु:खाच्या भावनांची त्याला जाणीव होते. ह्या कालावधीत झोपण्याची क्रिया जास्त असते.

● **शारीरिक विकास :** जन्माच्या वेळी वजन २.५ किलोग्रॅम ते ३.५ किलोग्रॅम असते. उंची १६ ते १८ इंच असते. पहिल्या ६ महिन्यांत वजन दुप्पट होते. शारीरिक विकासाची दिशा मस्तकाकडून पायाकडे असते. डोक्याचा आकार शरीराच्या आकाराच्या मानाने मोठा असतो. डोक्याची लांबी शरीराच्या १/४ इतकी असते. डोक्याच्या आकाराची वाढ पहिल्या दोन वर्षांत झपाट्याने होते व नंतर मंदावते.

शैशवावस्थेतील स्नायूंची वाढ मंदगतीने होते. जन्माच्या वेळी स्नायूंचे वजन एकूण वजनाच्या सुमारे २३ टक्के इतके असते. शैशवावस्थेतील स्नायूंची वाढ स्थूल स्वरूपाच्या हालचाली करण्याइतपत झालेली असते. जन्माच्या वेळी नाडीचे ठोके दर मिनिटाला १३० ते १४० इतके असतात. ते नऊ महिन्यांत ८० पर्यंत येतात. जन्माच्या वेळी फुप्फुसे अगदी लहान असतात. पहिल्या एक-दोन वर्षांत त्याची वाढ जलद गतीने होते, नंतर ती मंदावते. मलमूत्र विसर्जनाच्या बाबतीत दीड वर्षांपर्यंत मुलांचा ताबा शरीरावर नसतो, नंतर सवयी लागतात.

शैशवावस्थेतील कारक हालचाली शरीराच्या विकासावर अवलंबून असतात. सरकणे, रांगणे, उभे राहणे, चालणे, वस्तू हातांनी पकडणे इ. कृती क्रमबद्ध रीतीने होतात. जसजसा कारकशक्तीचा विकास होईल, तसतसे त्याच्यात कौशल्ये निर्माण होतात. अन्न ग्रहण करणे, कपडे घालणे, पेन्सिल धरणे, कात्रीचा वापर करणे, उड्या मारणे, ढकलणे, फेकणे, स्नायूंवर ताबा मिळविणे इ. क्रिया कौशल्ये मूल विकासानुसार संपादित करते.

नसांची व स्नायूंची परिपक्वता, साधनांची सुलभता, योग्य मार्गदर्शन, बालकाला मिळालेली संधी, ह्यावर कारक कौशल्ये अवलंबून असतात.

● **मानसिक विकास :** शारीरिक विकास सहजासहजी मोजता येतो. मानसिक विकास हा मेंदू व मज्जासंस्था ह्यांच्याशी निगडित असतो. नुकत्याच जन्मलेल्या बालकाला 'मानसिकता' नसते. ती हळूहळू विकसित होते. मानसिक विकासात संवेदन, अवबोध, अवधान, स्मरण, कल्पना, तर्क इ. मनोव्यापार येतात. नवजात बालक आवाज मोठा झाला तर दचकते. तीन-चार महिन्यांत त्याला मानसिकतेची जाणीव होते. प्राथमिक शाळेत जाण्याच्या वयाचे झाले की त्याची स्वत:विषयीची, मित्रांविषयीची, प्रौढांविषयीची वृत्ती निश्चित होते. मानसशास्त्रीय दृष्टिकोणातून मानसिक वाढीचा हा एक नाजूक कालखंड आहे. शैशवावस्थेतील बालकात जोरजोराने ओरडणे, रुसून बसणे, रडणे ह्या भावना प्रखरतेने जाणवतात. इतरांनी आपल्याकडे लक्ष द्यावे ही जाणीव निर्माण होते. ह्या वयात अवबोध हा मनोव्यापार सुरू होतो. पराकोटीची जिज्ञासा त्याच्यात येते. मन चंचल असल्याने ते एका वस्तूकडून दुसऱ्या वस्तूकडे आकर्षिले जाते.

— मानसिक विकास कसकसा होतो ह्याविषयी मानसशास्त्रज्ञांमध्ये मतभेद आहेत. काहींचे म्हणणे बालकाचा विकास नियमबद्ध असतो. दुसऱ्या मतप्रणालीनुसार बालकाच्या प्रतिक्रिया निष्क्रियपणे घडणाऱ्या असतात. त्यांच्या मते, वयाची परिपक्वता व अनुभवाचे संस्कार ह्यामुळे बालक मानसिकदृष्ट्या परिपक्व होत जाते.

आईवडिलांच्या अनुकरणातून त्याची शब्दसंपत्ती विकसित होते. या वयात मूल थोडे थोडे शब्द बोलण्यास सुरुवात करते. या वयात कल्पनाशक्तीचा आविष्कार दिसतो. 'कृतक विश्वास' (Make belief) हे या अवस्थेचे वैशिष्ट्य होय. 'काठीचा घोडा', 'खोक्याचा टी.व्ही.' अशा खोट्या वस्तूंशी खरी वस्तू समजून ती खेळत असतात. वस्तूंशी खोटे-खोटे खेळणे म्हणजे 'कृतक विश्वास' होय.

● **भावनिक विकास :** या अवस्थेतील भावना म्हणजे एक प्रकारचा उद्रेक असतो. आदळआपट, मोटतोड, वरतू फेकणे, वस्तू मोडणे ह्यात त्यांना आनंद असतो. आनंद व्यक्त करताना मोठमोठ्याने हसून, टाळ्या वाजवून, उड्या मारून आनंद व्यक्त करतात. आनंदाच्या वेळेला शरीर गदगदा हलवितात. शारीरिक कृतीतून भावाविष्कार व्यक्त करतात.

बालकाचा भावनिक विकास नीट झाला तर त्याचा सामाजिक, नैतिक विकास निश्चितच चांगला होतो. बालक जर रागीट असेल तर परिणामी ते आक्रमक बनते. रागापोटी मत्सर, द्वेष वगैरे भावना त्याच्या ठिकाणी निर्माण होतात. अंधार व बागुलबुवाची भीती त्याच्या मनात असते. मुले ह्या वयात संवेदनशील असतात. त्यांची मने नाजूक व कोमल असतात. सारखे रागावणे, कडक शिक्षा करणे, कोंडून ठेवणे, घाबरविणे ह्यामुळे त्यांच्यातील सुरक्षिततेची भावना कोमेजते. सापाकडे पाहताना ३ वर्षे वयाचे बालक सावधानता व कुतूहल भाव दर्शविते. परंतु भीतीच्या खुणा त्याच्या चेहऱ्यावर नसतात.

● **सामाजिक विकास :** या अवस्थेत आई हाच बालकाचा परिसर असतो. आईकडे टक लावून पाहणे, हसणे, तोंडातून आवाज काढणे, बोलण्याचा प्रयत्न करणे ही बालकाच्या सामाजिक जीवनाची सुरुवात असते. ह्या प्रतिसादासाठी ज्ञानेंद्रियांची संवेदनक्षमता व मानसिक विकास हे एका विशिष्ट पातळीपर्यंत येणे आवश्यक असते.

शैशवावस्थेतील मुलांचा सामाजिक विकास घरातील वडीलधाऱ्या व्यक्तीशी निगडित असतो. आई जवळ आली की हसणे, कुरवाळले की सुखावणे वगैरे लक्षणे त्याचे सामाजिक जीवन दर्शवितात. दुसऱ्या वर्षामध्ये ती एकमेकांशी खेळतात, एकमेकांशी बोलणे, देवघेव करणे सुरू करतात. पण ही मुले एकत्र खेळत नाहीत. खेळण्यांशी स्वतंत्रपणे खेळत असतात. मुलांच्या ह्या सामाजिक आंतरक्रियेत नियमितता नसते. वय वाढत जाते तसतशी समूह आंतरक्रियेची भावना वाढते.

ह्या कालखंडात बालक स्वार्थी व आत्मकेंद्रित असते. ते बालकमंदिरात गेल्यावर चूक किंवा बरोबर ह्या भावना त्यांच्यात जागृत होतात. त्याच्यामध्ये समूहाच्या वर्तनाची जाणीव होते. सहकार्य भावना त्याच्यात दिसते. बालकमंदिरात गेल्यावर इतर मुलांच्या आचार-विचारांचे संस्कार त्याच्यावर होतात.

● **शैक्षणिक महत्त्व :** शारीरिक, मानसिक विकासाचा क्रम लक्षात घेऊन शाळेत विविध कार्यक्रम आखावेत. बडबडगीते, छोटी-छोटी गाणी त्यांना शिकवावीत, चित्र काढून रंग भरण्याचे ज्ञान द्यावे, प्लास्टिकच्या खेळण्याचे सुटे भाग करून ते जोडण्यास सांगावेत, वस्तू ठरावीक ठिकाणी ठेवण्याची सवय लावावी. शैशवावस्थेतील शिक्षण अनौपचारिक पद्धतीचे असावे.

कार्यक्रम तयार करताना शारीरिक, मानसिक स्तर लक्षात घेऊन कार्यक्रम तयार करावेत. कार्यक्रमाची कालमर्यादा कमी तासिकांची असावी. लहान मुले चंचल असतात, एका जागी स्थिर बसू शकत नाहीत. गाणी शिकवून त्यांच्याकडून म्हणून घ्यावीत. सहकार्याची, परस्परांविषयी प्रेम व आदर व्यक्त करण्याची, परस्परांना मदत करण्याची व आपुलकीची वृत्ती त्यांच्यात निर्माण करावी.

निसर्ग, पशुपक्षी, बागबगिचा यांचे निरीक्षण करण्यास सांगावे. कारक शक्तीच्या विकासासाठी बालमंदिरात आल्यावर खाऊचा डबा, दप्तर इ. व्यवस्थित ठेवावयास सांगावे. शर्टची बटणे लावणे, नाडी बांधणे, पाणी बाटलीत भरणे, रांगोळी काढणे ह्या कृती त्यांना करावयास सांगाव्यात.

त्यांना वाचन, लेखन, शिकवू नये. कारण त्यांच्या बोटांच्या स्नायूंना परिपक्वता आलेली नसते. पेन्सिल धरणे, रेघा मारणे, चित्र काढणे इत्यादी प्रकारची पूर्वप्राथमिक शाळेत जाण्याची तयारी करवून घ्यावी.

### ३. पूर्व बाल्यावस्था (Early Childhood)

वय वर्षे ६ ते ९ हा कालावधी पूर्व बाल्यावस्थेचा असतो. बालवाडीतून प्राथमिक शाळेत प्रवेश करण्याची ही अवस्था आहे. 'प्राथमिक शाळेचे वय', 'खेळण्याचे वय', 'टोळी वय', 'गट वय' अशा विविध नावाने ह्या अवस्थेला संबोधले आहे. ह्या वयातील मुला-मुलींच्या शरीरात फारसे बदल होत नाहीत. विकासाची गती कमी असते. मानसिक विकास अधिक होत असल्याने तो अनुभवसमृद्ध होतो आणि त्याचा आत्मविश्वास वाढतो.

● **शारीरिक विकास :** शैशवावस्थेतील विकासाच्या मानाने ह्या अवस्थेतील विकासाची गती कमी असली तरी पुढील विकासावस्थेच्या मानाने जास्त असते. उंचीत वाढ झपाट्याने झाल्याचे स्पष्ट दिसते. सहाव्या वर्षी उंची प्रौढपणाच्या उंचीच्या २/३ इतकी होते, वजन १/३ इतके असते, मेंदूचा विकास साधारणत: ८० टक्के झाला असल्याने शालेय विषय शिकण्यास शारीरिक व मानसिकदृष्ट्या ह्या अवस्थेतील मुले समर्थ झालेली असतात. त्यांच्या स्नायूंच्या चलनवलनात समतोल नसतो. मुलामुलींच्या वजनात, उंचीत फरक असतो. दुधाचे दात पडून नवीन दात येण्यास सुरुवात झालेली असते. पक्के दात येतात, त्यामुळे सुरुवातीला जबडा रुंदावतो, कपाळ, नाक, ओठ ह्या ठेवणीत बदल होतो.

● **मानसिक विकास :** ह्या अवस्थेत शाळेत जाऊन शिकण्याइतपत बुद्धीचा विकास झालेला असतो. मेंदूचा विकास ८० टक्के झाला असल्याने शारीरिक व मानसिकदृष्ट्या तो



सशक्त व समर्थ बनतो. लिहावे, वाचावे, शब्दसंपत्ती वाढवावी याकडे विशेषत्वाने त्याचा कल असतो. अवधान कक्षा मर्यादित असल्याने दोन किंवा तीन अक्षरांचे वाचन तो व्यवस्थित करतो. ह्या काळात त्याच्यात नवनवीन कौशल्ये विकसित होत असतात. ती स्वत: करावीत असे त्याला वाटत राहते. शाळेतील शिक्षकांचे मत तो ग्राह्य मानतो. त्यांच्याबद्दल त्याच्या मनात आदराची, प्रेमाची भावना असते.

सभोवतालच्या मूर्त वस्तूंबद्दलच्या संकल्पना मनामध्ये जागृत झालेल्या असतात. वस्तूची व्याख्या सांगताना वस्तूचा उपयोगही तो सांगतो. प्रेम, सहानुभूती, न्याय, शौर्य ह्या अमूर्त संकल्पनांचा अर्थ तो सांगू शकत नाही. पण घटनेवरून तो संकल्पना ओळखतो. नीती-अनीतीची त्याची कल्पना बोथट असते. पण बरे-वाईट काय आहे याची जाणीव त्याला असते. सचोटी, मित्रता, प्रेम, समता, सहकार्य, न्यायाची भावना याची काटेकोरपणे ते दखल घेतात.

भाषा विकसित झाल्याने बोबडे बोल किंवा बालिश बोलणे टाळतात. त्याला गणितातील कोडी, विनोदी चुटके वाचायला व सांगायला आवडतात. परिकथा, दंतकथा ह्यांचे आकर्षण असते. त्यावरील पुस्तके ते आवडीने वाचतात. नवनवीन शब्द वाचण्याकडे कल असतो. तो गुंतागुंतीच्या गोष्टीत अभिरुची व्यक्त करतो.

● **भावनिक विकास :** ह्या वयातील मुलांचा भावनिक विकास होत असल्याने भावना व्यक्त करताना ते चीडचीड करीत नाहीत. आपल्याला कोणी 'कुकुबाळ', भागुबाई', 'भेकड' म्हणू नये यासाठी ते भावनांचा उद्रेक टाळतात. पण घरी भावनांवर नियंत्रण ठेवण्याची त्याला गरज वाटत नाही.

या वयातील मुलांना दोषारोप केलेले, रागावलेले आवडत नाही. आई-वडिलांनी, शिक्षकांनी आपली स्तुती करावी; आपल्या चांगल्या कृतीला प्रोत्साहन द्यावे असे त्याला वाटत राहते. या कालावधीत त्याचे स्वतंत्र व्यक्तिमत्त्व बनते त्यामुळे स्वत:च्या स्वतंत्र वस्तू असाव्यात ह्याकडे त्याचा कल असतो. न आवडणाऱ्या कामाबद्दल तो नापसंती दर्शवितो.

शाळेतील इतर मुलांशी जमवून घेण्याचा तो प्रयत्न करतो. आत्मकेंद्रित असलेली त्याची वृत्ती तो बदलण्याचा प्रयत्न करतो, तरी स्वत:तील 'स्व' विसरण्याची त्याची तयारी नसते. पूर्वीपेक्षा जास्त आत्मविश्वास त्याच्यात निर्माण होतो. कोणतेही कौशल्यात्मक काम करताना दुसऱ्यावर अवलंबून न राहता स्वत: काम करण्याचा तो प्रयत्न करतो.

कल्पनाशक्ती, वस्तुस्थिती, कल्पितस्थिती यातील भेद त्याला समजत नाहीत, त्याचे कारक कौशल्य विकसित होते, चौकस बुद्धी वाढते. बाल्यावस्थेप्रमाणे या वयोगटातही त्यांना काल्पनिक गोष्टींची भीती जास्त वाटते. त्यात भूतखेत, प्रेत, काळोख, अंधार, ढगांचा गडगडाट, विजेचा लखलखाट ह्यांचा समावेश असतो. आपल्या कामात दोष दाखविले की त्यांच्यात क्रोधाची भावना निर्माण होते. क्रोध व्यक्त करताना बालिश कृती न करता रुसणे, रागावणे, नकार देणे या कृती ते करीत असते. आनंद व्यक्त करताना ते कृतीतून आनंद व्यक्त

करते. प्रेमाचे प्रदर्शन केलेले त्याला आवडत नाही. त्याचे पापे घेतलेले, कुरवाळलेले त्याला आवडत नाही. जिज्ञासा प्रवृत्ती जागृत झालेली असते. त्यामुळे वस्तूचे निरीक्षण करून, हाताळून उलटसुलट करून त्याबद्दल स्वतःची भावना ते व्यक्त करतात.

● **सामाजिक विकास :** या अवस्थेत त्याचे सामाजिक क्षेत्र विस्तारलेले असते. बालवयातच सामाजिक प्रवृत्ती विकसित झालेल्या असतात. त्याचा सामाजिक प्रवृत्तींच्या विस्तारण्याचा अनुभव ह्या अवस्थेत त्याला येतो. शाळेतील इतर मुलांच्या सहवासात असल्यामुळे, त्याच्या सामाजिक विकासास वळण लागते. शाळा व घर यातील फरक त्याला जाणवतो. शाळेत अनेकांपैकी आपण एक आहोत ह्याची जाणीव त्याला होते. घरातल्यासारखी शाळेत दखलच घेतली जात नाही, ही भावना या अवस्थेतील मुलांना सतावीत असते. सामाजिक समायोजन साधण्याचा ते प्रयत्न करतात.

पूर्व बाल्यावस्थेतील महत्त्वाचा सामाजिक घटक 'आई' हा असतो. कौटुंबिक जीवनात आईला महत्त्वाचे स्थान असते. या वयातील मुले तिच्या परवानगीनेच सर्व गोष्टी करतात.

सहाव्या वर्षानंतर शालेय वातावरणात बालक रमते. शाळेतील मित्र, सवंगडी निवडताना त्यांचा धर्म, जात, पंथ, सामाजिक स्थान या गोष्टींचे भान त्याला नसते; तर खेळातील कौशल्य, सवंगड्यांचा स्वभाव या गोष्टी बालकाच्या दृष्टीने महत्त्वाच्या असतात. ह्या वयात मुले गटागटाने राहतात, गटाची शिस्त पाळतात, नेतृत्व व सहकार्याची भावना येथे विकास पावत असते. या कालखंडात मुले-मुली एकत्र खेळतात. गरीब-श्रीमंत, उच्च-नीच असा भेदभाव त्यांच्यात नसतो. सांकेतिक भाषेचा वापर त्याच्या गटातील मुलांच्यात असतो, बालक शाळेत रमते, स्थिरावते, शिक्षकांचा आदेश पाळते, मित्रांच्या बरोबर अभ्यास पूर्ण करते, शालेय कार्यक्रमात सहभागी होते, शाळेतील मुलांशी ते जमवून घेते, ह्या सर्व समायोजक गोष्टी ते इतर सवंगड्यांच्या साहाय्याने शिकत राहते.

● **शैक्षणिक महत्त्व :** या कालावधीत औपचारिक शिक्षणाला सुरुवात होते. शाळेमध्ये या काळात मुलांच्या हालचालीला भरपूर वाव द्यावा. धावणे, बागडणे, उड्या मारणे, चढ-उतार करणे अशा शारीरिक क्रियांत त्याला आनंद वाटत असतो. स्नायूंचा विकास चांगल्या पद्धतीने होण्यासाठी स्वतःच्या गोष्टी स्वतः करण्यास द्याव्यात.

या काळात मानसिक विकास प्रक्रियेची सुरुवात असल्याने वाचन, लेखन कौशल्याकडे लक्ष द्यावे. मुले चंचल असतात. खूप वेळ एका ठिकाणी स्थिर होत नाहीत, त्यामुळे शालेय स्तरावरील वेळापत्रक सोपे, सुटसुटीत, कमी वेळेचे तयार करावे. अध्यापनात कृतीला वाव द्यावा. सर्जनात्मक कौशल्याच्या विकासासाठी [illegible]निर्मितीची संधी मुलांना द्यावी. मातीकाम, चित्रकला, बागकाम, कातरकाम इ. कौशल्ये विकसित करावीत. जिज्ञासा प्रवृत्ती वाढीस लागल्याने विविध प्रश्नांचा भडिमार ती करतात. आजूबाजूचा परिसर, डोंगर, नद्या, पर्वत, रस्ते ह्याविषयी जास्तीत जास्त माहिती मिळविण्याचा प्रयत्न ती करीत असतात. ही त्यांची जिज्ञासूवृत्ती शिक्षकांनी जोपासावी.

भाषिक कौशल्य विकसित होत असल्याने शाळेत गोष्टी सांगणे, गाणी म्हणणे, कविता [illegible] कल्पनाशक्तीचा विकास होत असतो. मुलांना परिकथा, जादूच्या कथा, चांदोबा, चंपक इ. बालसाहित्य पुरवावे.

### ४. उत्तर बाल्यावस्था (Late Childhood)

उत्तर बाल्यावस्थेचा कालावधी ९ ते १२ वर्षे इतका असतो.

● **शारीरिक विकास :** या अवस्थेत मुलींच्या वाढीचा वेग जलद होत असतो. मुलांच्या बाबतीत वाढीचा वेग मंदावलेला दिसतो. मुलांच्या पायाची लांबी शरीराच्या इतर भागाच्या मानाने जास्त वाढते, धड लांबट होते व खांदे खाली उतरतात. मेंदू बाह्य रचनेच्या दृष्टीने विकसित झालेला असतो, पण पूर्ण विकसित झालेला नसतो. शरीरातील रक्ताभिसरण प्रक्रिया, श्वसन, पचनसंस्था कार्यक्षम झालेल्या असतात. त्यांची वाढ चालूच राहते.

● **मानसिक विकास :** ह्या वयात बालकाचा मानसिक विकास वाढलेला असतो. अनुभव क्षेत्र विस्तारलेले असते. निरीक्षण क्षेत्र व अवधान कक्षा विस्तारलेली असते. स्वतःविषयी आशा-आकांक्षा तयार होतात. स्मरणशक्तीचा विकास होतो. मेंदू बाह्य रचनेच्या दृष्टीने पूर्ण विकसित झालेला असतो. पण संबोध, अनुमान, कल्पना या मनोव्यापाराचा विकास करणाऱ्या नसपेशी विकसित झालेल्या नसतात. बौद्धिक विकासाची लक्षणे त्याच्यात निश्चितपणे दिसू लागतात. कूटप्रश्न, समस्या, कोडी सोडविण्याकडे त्याचा जास्त कल असतो.

भाषा विकसित झाल्यामुळे व अनुभवसमृद्धतेमुळे परिकथा, दंतकथा अशा काल्पनिक गोष्टींची पुस्तके वाचण्याचा बालकाला कंटाळा येतो. निसर्गवर्णन, प्रवासवर्णन, ऐतिहासिक गोष्टी, किशोर मासिके, अन्य देशी भाषेतील पुस्तके वाचण्यामध्ये रुची निर्माण होते. विनोदाचे अंग निर्माण झालेले असते त्यामुळे विनोदी चुटके वाचावेत, सांगावेत, ऐकावेत असे वाटत असते.

प्रेम, सहानुभूती, न्याय इ. अमूर्त कल्पना स्पष्ट करता येत नसल्या, तरी घटनेच्या साहाय्याने त्या अमूर्त कल्पना आहेत हे सांगता येते. नवनवीन मित्रांचा सहवास मिळाल्याने बालक समाजजीवनात सहभागी होते. काल्पनिक विश्वात ते रमत नाही. व्यक्तिमत्त्व झपाट्याने वाढल्याने मानसिक प्रक्रिया दृढ होऊ लागतात. वेळेची संकल्पना स्पष्ट झालेली असते. त्यामुळे ते कामाचे वेळापत्रक तयार करते.

मुलांचे हे वय निश्चिंतपणाचे असते पण आईवडिलांचे प्रेम, सुरक्षितता याबद्दल त्यांना काळजी वाटत असते. नवनवीन मित्र मिळविणे, समाजजीवनात सहभागी होणे याकडे त्यांचा कल असतो. कुटुंबापेक्षा समवयस्कांच्या मतांना ते मान देतात. क्रीडन व अनुकरण ह्या सामान्य प्रेरणा त्यांच्यात निर्माण झालेल्या असतात. ह्या वयात सर्जनशील कल्पनाशक्ती वेगाने विकसित होत असल्याने नवनवीन खेळ तयार करून आणि निरनिराळे नियम वापरून ही मुले खेळ खेळतात. कल्पनेने चित्रे काढतात, रंगवतात, नवीन शब्द तयार करतात.

● **भावनिक विकास :** या अवस्थेत भावनांना वळण लावण्याचा प्रयत्न ते करते.

आपण लहान नाही आहोत, याची जाणीव त्याला होते. घरातील व बाहेरील भावनेत फरफार दिसतो. भावनेचा उद्रेक न करता त्या दाबण्याचा प्रयत्न करतो. कारण मित्रांनी आपल्याला हास्यास्पद लेखू नये ही भावना त्यामागे असते. स्वत:विषयी काही आकांक्षा असतात, न आवडणाऱ्या कामाविषयी, वस्तूविषयी तक्रारी करीत असतो. जसजसा भावनिक विकास होतो तसतसा किशोर सुस्वभावी, सालस, प्रेमळ बनत जातो. स्वत:च्या भावना त्याला शब्दांत व्यक्त करता येतात. अनुभव क्षेत्र विस्तारलेले असल्याने सौंदर्य, विश्वास, माणुसकी अशा शब्दांचे अर्थ तो समजतो. मुलामुलींचे स्वतंत्र गट निर्माण होतात. विविध प्रकारचे सांघिक खेळ खेळतात, गटात वेळ घालवितात, मनोरंजनात्मक कार्यक्रम आखतात, गुप्तता पाळणे, सांकेतिक भाषेचा वापर करणे इ. विविध प्रक्रिया मुलांच्या गटात चालतात. या वयात आवंड अभिरुची ही वैशिष्ट्ये त्यांच्यात दिसून येतात.

● **सामाजिक विकास :** बालवयात सामाजिक विकास होतो. ह्या कालावधीत तो जास्त वाढीस लागत असल्याने मुले 'टोळ्या' करतात, म्हणून या अवस्थेला 'टोळीवय' म्हणतात. या अवस्थेतील मुले 'शाळकरी मुले' म्हणून ओळखली जातात. सहकारवृत्ती व समूहात जमवून घेण्याची तयारी त्यांच्यात दिसते. सोबत्यांची संगत हवी असते, टोळी बनविताना समान वयाच्या जवळपास राहणाऱ्या व समान बुद्धीच्या मुलांची टोळी बनत असते. कंपू, टोळी करून राहणे, सांकेतिक भाषेत बोलणे, गट्टी फू करणे, अबोला धरणे, सांघिक खेळ खेळणे इ. क्रिया या वयात चालतात. या काळात गटाच्या सदस्यांची संख्या मर्यादित असते. सांकेतिक भाषेचा वापर गटामध्येच माहिती असतो. गटाचे नीतिनियम पाळावे लागतात. गटाचे वर्चस्व त्याच्यावर असते. कपडे, आवड, बोलणे, वागणे, केशरचना, आचार-विचार इ. सर्व बाबतीत आवड-निवड वगैरे करताना गटाच्या मर्जीनुसार केली जाते. समूहाशी समायोजन करावे लागते. एक-दोन मित्र असून चालत नाही तर पाच-सहा जणांचा समूह असावा लागतो.

या अवस्थेत आकलनक्षमता वाढीस लागते, त्या प्रमाणात समज वाढत जाते. सामाजिक जीवन समृद्ध झाले की मूल्य व अभिरुची यातही बदल होतो. त्यांची नैतिकताही बदलते. पारंपरिक चालीरीतींना विरोध दर्शविला जातो. या वयात पालकांचे दडपण नको असते. पालकांनी घालून दिलेल्या नियमांकडे दुर्लक्ष करतात. समवयस्कांच्या तत्त्वाकडे मन वळते. ती तत्त्वे काही वेळेला ते मूल स्वीकारते, जवळचे मित्र सहकारी यामुळे त्यांची मूल्ये आणि अभिवृत्ती यात फरक जाणवतो.

उत्तर बाल्यावस्थेच्या काळामध्ये सामाजिक प्रवृत्तीचे स्पष्ट अंकुर जाणवतात. या कालावधीत सामाजिक समायोजन जीवनातील इतर कोणत्याही कालावधीपेक्षा सरस असते, गट अल्पजीवी असतात, बाल्यावस्थेत सामाजिक संबंध वाढल्याने, आत्मविश्वास दुणावल्याने, आई-वडिलांचा सहवास कमी होतो.

● **शैक्षणिक महत्त्व :** कारक कौशल्यांचा विकास झाल्यामुळे मुले सारखी धडपडत असतात. झाडावर चढणं, पोहणे इ. विविध कौशल्ये आत्मसात करीत असतात. म्हणून शाळेत त्यांना व्यायामाच्या दृष्टीने मार्गदर्शन करावे.

औपचारिक शिक्षणास सुरुवात झाली असल्यामुळे वाचलेल्या घटकांचा आशय समजून घेण्याकडे त्याचा कल असतो. भाषण-संभाषण याच्याशी भावनिक नाते निर्माण झालेले असते. त्यांच्या भाषण व वाचन कौशल्याकडे शिक्षकांनी लक्ष द्यावे. ऐतिहासिक कथा, टाझन कथा, साहसी गोष्टी वाचण्यास प्रवृत्त करावे. त्यातून त्यांचा वास्तववादी दृष्टिकोण वाढीस लागतो.

समाजातील इतर मुलांशी संबंध प्रस्थापित झालेले असतात. गट, समूह वाढीस लागल्याने संघप्रवृत्तीचा फायदा करून घेणे शक्य असते. संघप्रवृत्तीमुळे अभ्यास व कला यांचा विकास साधता येतो. चर्चा, संवाद यांना वाव मिळतो. विविध कलांचा, छंदांचा विकास होतो. स्थळ, काळ ह्या संकल्पना मुलांना कळू लागलेल्या असतात. वस्तूचे वजन, खोलीची लांबी-रुंदी ते सांगू शकते.

बाल्यावस्थेतील मुलामुलींच्या मनात शिक्षक-शिक्षिकेबद्दल आदराची भावना असते. त्यांच्या आदरयुक्त भावनेला तडा न जाईल असे वर्तन शिक्षकांकडून होणे गरजेचे असते. शिक्षकांनी मुलांवर चांगले संस्कार करावेत, कारण त्यांच्या संस्कारातून उद्याचा भावी नागरिक तयार होणार असतो. शिक्षकांचे वर्तन सहानुभूतीचे, प्रेमाचे, प्रामाणिकपणाचे व काटेकोरपणाचे असावे.

पठडीतील अभ्यासक्रमाच्या वाटेने न जाता मुलांचा उत्कर्ष घडविण्याच्या दृष्टीने पुस्तकांची उपलब्धता, सार्वजनिक कार्यक्रम, नामवंताच्या मुलाखती अशा सोई उपलब्ध कराव्यात. पक्षी निरीक्षण, जंगल, पर्यावरण अभ्यास, संगीत, चित्रकला, नृत्य, नाट्य, आकाशदर्शन अशा वेगवेगळ्या वाटेने त्यांना मार्गदर्शन करावे. त्यांच्यात संशोधनप्रवृत्ती जागृत करावी. उत्तरावस्थेमध्ये ह्या सर्व गोष्टींची त्यांना आवश्यकता असते.

## ५. पूर्व कुमारावस्था (Early Adolescence)

या अवस्थेचा कालखंड १३ ते १६ वर्षे असा असतो.

मानवी आयुष्यातील मौल्यवान कालखंड म्हणजे पूर्व कुमारावस्था होय. ह्या काळात कुमार-कुमारी शारीरिक व मानसिक अवस्थेतून भराभर विकसित होत असतात. या अवस्थेत कुमारांना हाताळणे पालकांना कठीण जाते. प्रौढावस्थेच्या उंबरठ्यावर ते प्रवेश करीत असतात. प्रौढांच्या जीवनातील ज्ञान जाणून घेण्याची त्यांची तीव्र इच्छा असते.

मानसशास्त्रज्ञांनी या कालखंडाला संक्रमणाचा कालखंड मानले आहे. या अवस्थेत कुमार हा बाल नसतो आणि प्रौढही नसतो.

स्टॅन्ले हॉलच्या मते, कौमार्यावस्थेत मुला-मुलींचा नवीन जन्म होतो, नवीन प्रवृत्ती, वर्तनप्रकार, दृष्टिकोण या वयात निर्माण होतात, या अवस्थेत त्यांच्यात प्रजननक्षमता विकसित होऊ लागते.

काही मानसशास्त्रज्ञांच्या मते, पूर्व कुमारावस्था म्हणजे आयुष्यातील अवस्थांतराचा

कालखंड होय. या कालखंडात बऱ्याचशा वर्तनात बदल होत असतो. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे झाले तर कुमारावस्था म्हणजे मानवी जीवनातील वेगळी वाट जी मनुष्याला पुढील आयुष्याच्या चांगल्या वळणावर घेऊन जाते.

पूर्व कुमारावस्थेमध्ये सुरुवातीच्या, कालखंडात महत्त्वपूर्ण शारीरिक व अंतर्गत बदल घडत असतात.

● **शारीरिक विकास :** ह्या अवस्थेत महत्त्वाचे बदल घडून येतात ते म्हणजे -

१. लैंगिक बदल

२. शारीररचनेतील बदल

३. अंत:स्रावी ग्रंथीतील बदल.

या वयात धडाची लांबी वाढते, शरीर भरते म्हणून हातपाय धडाच्या मानाने लांब दिसत नाहीत. वजन, उंची एकदम वाढते. मुलीची उंची, वजन १२ ते १३ या वयातच वाढलेले दिसून येते. मुलांची उंची २ ते ३ वर्षे वाढतच राहते. मुलींना मुलांपेक्षा परिपक्वता लवकर येते. १४ ते १६ वर्षे वयात मुलींपेक्षा मुलांची उंची जास्त झालेली दिसून येते.

मुलांच्या शरीरयष्टीमध्ये फरक जाणवतो, खांदे रुंदावतात, आवाज घोगरा होतो, मिसरूड फुटते, लैंगिक इंद्रिय आकाराने, शक्तीने विकास पावतात. मुलांप्रमाणे मुलींच्या शरीरातही बदल जाणवतो. मुलींचे वक्षस्थळ व नितंब आकार घेतात. चेहऱ्यावर पुटकळ्या दिसू लागतात. शरीर प्रमाणबद्ध दिसू लागते. स्त्रीत्वाचा स्पर्श तिच्या शरीराला आला असल्याने स्त्रीत्वाकडे ती झुकते.

बाह्य बदलाप्रमाणे आंतरिक बदल होतात, आतड्यांच्या लांबीत, परिघात वाढ होते. पोटाचे स्नायू वाढतात. ओटीपोटाचा खालचा भाग रुंदावतो. स्त्रियांच्या अंडाशयात व मुलांच्या वृषणात लैंगिक हार्मोन्सशिवाय इतर स्राव वाहतात. त्यामुळे लैंगिक ग्रंथीच्या विकासाला चालना मिळते व कामवासना प्रज्वलित होते.

मुला-मुलींच्या अंत:स्राव ग्रंथीत बदल घडून येतो. मस्तकग्रंथी, लैंगिक ग्रंथी, वृक्कस्थ पिंड यातील स्रावांमुळे मुला-मुलींची उंची वाढण्यास मदत होते.

प्रजननाच्या इंद्रियाच्या वाढीचे मुख्य लक्षण म्हणजे रजोदर्शन होणे. सुरुवातीस ते अनियमित, अव्यवस्थित असते. त्यामुळे या काळात मुली गांगरून जातात. पोटात दुखणे, डोके दुखणे, पाय दुखणे, वजन वाढणे याचा मुलींना त्रास होतो, मन:स्वास्थ्य बिघडते, अस्वस्थता निर्माण होते व निराशा वाटते.

कुमारवस्थेत शरीराचा विकास तीव्र गतीने होतो. मुले वयात येण्यापूर्वीच या विकासाला एक दोन वर्षे आधी सुरुवात झालेली असते. १५ ते १७ वर्षे वयात वाढीचे प्रमाण अधिक आढळते. मुले व मुली या बदलामुळे गोंधळून जातात. १८ वर्षांपर्यंत अक्कलदाढा येतात. शारीरिक वाढ व लैंगिक वाढ यामुळे अनेक परिणाम दिसून येतात. शारीरिक व लैंगिक वाढीचे मुला-मुलींच्या वर्तनावर अनेक परिणाम झालेले आढळून येतात. लैंगिक भुकेची सरुवात होते. त्यांच्या आहाराचे प्रमाणही वाढते.

असते. अमूर्त विचारक्षमता विकसित झालेली असते. त्यामुळे सौंदर्य, सहानुभूती, विश्वास, अभिरुची, चपळाई, कपट या संकल्पनांचा अर्थ त्याला समजतो. अवधान कक्षा विस्तारते. विविध विषयांशी संपर्क येत असल्याने अनुभवक्षेत्र विस्तारते. मुलां-मुलींना विविध विषयांत रस वाटतो. मुलींना भाषा, गृहजीवनशास्त्र, कला या विषयांत आवड निर्माण होते. किशोरावस्थेतील वाचनीय पुस्तकांचा कल कमी होऊन कथा-कादंबऱ्या, मासिके, वर्तमानपत्रे वाचू लागतात. वस्तुस्थितिदर्शक कृतीकडे वळतात. काव्यातील अमूर्त कल्पना त्यांना समजू लागतात. विविध विषयांतील समस्या सोडवू लागतात. उद्गामी, अवगामी तर्क करू शकतात. वैज्ञानिक व प्रायोगिक संशोधनाकडे वळतात. दैनंदिन वाचनात अभिरुची वाढलेली दिसते.

● **भावनिक विकास :** या अवस्थेत मुला-मुलींमध्ये शारीरिक व जैविक बदल घडून आल्यामुळे ती गोंधळून जातात. शरीरातील अंत:स्रावी ग्रंथींच्या फेरबदलामुळे त्यांच्यात भावनिक बदल जाणवतो. समाजाच्या त्यांच्याकडून वागण्याच्या संदर्भात ठरावीक अपेक्षा असतात त्याचाही त्यांच्या मनावर परिणाम होत असतो. ज्या कुमारांच्यात अंत:स्राव फेरबदल एकदम थोड्या अवधीत झालेला असतो, त्यांना भावनाक्षोभ लवकर होतो. या वयात विषमलिंगी आकर्षण असते. कुमारांच्या भावना या अवस्थेत तीव्र असतात. भावनांवर नियंत्रण ठेवणे कठीण जाते, भावना लवकर बदलतात. दु:ख व आनंद पाठशिवणीचा खेळ चालू असतो. काही कुमार आपल्या भावना मनात कोंडून ठेवतात. त्यामुळे त्यांच्या वागणुकीवर परिणाम होतो. अशी मुले उद्विग्न असतात. अशा मुलांच्या स्थिरवृत्ती जोरदार असतात. क्रोध, भीती, मत्सर, प्रेम, जिज्ञासा या भावना त्यांच्यात दिसून येतात. कमालीचे अस्थिर व भावपूर्ण जीवन ते जगत असतात. अंत:स्रावी ग्रंथी जितक्या जास्त कार्यक्षम तितक्या व्यक्ती भावमय बनतात. मुला-मुलींच्यात बंडखोर वृत्ती निर्माण होते. अशा प्रकारे विविध स्वरूपाचा शारीरिक व मानसिक बदल या कालखंडात होतो. म्हणूनच या कालखंडाला 'वादळ व ताण-तणावाचा काळ' असे म्हटले जाते.

● **सामाजिक विकास :** मानसिक संघर्षामुळे समाजातील इतर लोकांशी ते संपर्क कमी ठेवतात. कुमार-कुमारी गटागटाने - गप्पागोष्टी, वैचारिक देवघेव करतात. बाल्यावस्थेतील 'गट', 'कंपू', 'संघ' याचे अस्तित्व कमी झालेले असते. संख्याही कमी असते. भाषा, पेहराव, अभिरुची इत्यादी गोष्टींत बदल दिसून येतात. नटनट्या, क्रीडाक्षेत्र या क्षेत्रांतील 'आदर्श' त्यांच्यासमोर असतो. सामाजिक कार्यात सहभागी होण्याचा प्रयत्न करतात.

## ६. उत्तर कुमारावस्था (Late Adolescence)

उत्तर कुमारावस्था १७ ते २१ या वयाला मानली जाते. पूर्वकुमारावस्थेत मुलामुलींमधील जैविक, शारीरिक, लैंगिक बदल झाल्याने मानसिक, भावनिक, सामाजिकदृष्ट्या ती अस्थिर बनलेली असतात. मात्र या अवस्थेत आचार-विचार, भावना सर्वच बदललेल्या असतात.

आकर्षक दिसण्याकडे, बनण्याकडे जास्त कल असतो ...
असल्याने स्थिर होण्याच्या मार्गावर असतात.

● **शारीरिक विकास :** शारीरिक गती मंदावते. वजन, उंची वाढत नाही, स्नायूंना आकार आल्याने शरीराचा बेडौलपणा नाहीसा होतो. सुरुवातीच्या वाढीत निर्माण झालेला असमतोल नाहीसा होऊन शरीर आकर्षक व कणखर बनते. कुमारावस्थेत भूक कमी होऊन शरीर सुडौल होण्यासाठी अन्नपदार्थांची निवड केली जाते. मुले शरीर दणकट व कणखर बनण्यासाठी पोषक अन्न घेतात. सामाजिक बंधनामुळे त्यांच्यात कामवासनेच्या बाबतीत दमन व द्वंद्व दिसून येते.

● **मानसिक विकास :** मानसिक गती तीव्र होण्याचा हा काळ असतो. ह्या काळात एकटे राहण्याची इच्छा होते, काम करण्याचा कंटाळा येतो, मानसिक अस्वस्थता जाणवते. समाजातील आचार-विचार, अंधश्रद्धा, परंपरा, मूल्ये यांचे मूल्यमापन करून स्वतंत्रपणे परखडपणे स्वतःचे विचार मांडले जातात. भावी आयुष्याच्या तयारीसाठी अभ्यासक्रम, व्यवसाय यांचा विचार त्यांच्यात सुरू होतो. भविष्याची चिंता त्यांना सतावीत असते. वादविवाद, चर्चेतून जीवनाला विशेष दिशा देण्याचा प्रयत्न करीत असतात. मुला-मुलींच्या विचारात फरक दिसतो. मुलींच्या विचारावर भावनांचा पगडा दिसून येतो. त्या आपल्या कर्तृत्वाचा विचार करतात. जुन्या-नव्या पिढीतील संघर्ष या अवस्थेत दिसून येतो. कुमार या अवस्थेत सुधारकी थाटाने वागतात व बोलतात, अनुभवाचे गाठोडे अपुरे व विचारसरणी बेताची असते. मानसिक शक्तीचा विकास झालेली असला तरी भावनिकतेची छाप अजून दिसून येते.

● **भावनिक विकास :** शरीरातील अंतःस्राव ग्रंथीच्या कार्यात बदल झाल्यामुळे मानसिक परिणाम घडून येत असतात. भावनिक व सामाजिक बदलांमुळे त्यांच्यावर एक प्रकारचा भावनिक ताण निर्माण होतो त्यांना स्वातंत्र्य हवे असते. तरीपण संरक्षणासाठी आईवडिलांची गरज लागते. या अवस्थेतील भावना अस्थिर व तीव्र असतात. अहंकार अत्यंत संवेदनशील असतो. आपल्याला लहान मूल समजून आपला अपमान करीत आहे असे त्याला जाणवले तर मोठ्यांच्या कृतीचा त्यांना राग येतो. रागवणाऱ्या व्यक्तीशी बोलणे टाळतात, अबोला धरतात. घरातील पालक, भावंडे यांच्याशी चांगले संबंध असले तर त्याच्याबद्दल प्रेम वाटत असते, त्यांचा सहवास त्यांना हवासा वाटत असतो.

जिज्ञासा प्रवृत्ती वाढत असल्याने लैंगिक प्रश्नाबाबत कुतूहल निर्माण होते. भावनाक्षोभ निर्माण होण्याचे अनेक प्रसग निर्माण होतात. परिपक्वता प्राप्त झाल्याने राग व्यक्त करीत नाहीत. नकोशी वाटणारी परिस्थिती टाळण्याचा ते प्रयत्न करतात. या वयात कुमार हळवा, चिंताग्रस्त असतो. भावनिक आंदोलन सतत चालू असते. म्हणून ह्या काळाला वादळाचा अशांततेचा काळ (Period of strom and stress) म्हटले जाते. भावी जीवनाविषयी रमणीय सुखस्वप्ने रंगविणे, कल्पनाविश्वात रमणे व वस्तुस्थितीकडे दुर्लक्ष करणे या गोष्टी या अवस्थेत प्रकर्षाने जाणवतात.

... अवस्थेत समाजमान्यता मिळविण्याकडे विशेष लक्ष वेधलेले असते. आपण आता प्रौढ होत चाललो आहोत हे दाखविण्याचा ते प्रयत्न करतात. बाल्यावस्थेतील 'समूह' अथवा 'कंपू', 'गट' कमी होत जाऊन समान अभिरुची, वृत्ती, मूल्ये असलेल्यांशी मैत्रीचे नाते जोडले जाते. या वयातील मैत्री कायमस्वरूपाची असते. मानसिक संघर्षामुळे आपली सुखदुःखे आपले विचार ऐकणाऱ्या मित्रांशी, मैत्रिणींशी मैत्रीचे नाते वाढवितात. मुला-मुलींचे एकमेकांविषयी आकर्षण वाढीस लागलेले असते. एकमेकांच्या सहवासाच्या ओढीमुळे एकमेकांना भेटण्याची, सहवासात राहण्याची तीव्र इच्छा असते. प्रेमगीत गात असतात. आकर्षक कपडे, सौंदर्यप्रसाधने वापरणे, नीटनेटके राहणे, आकर्षक दिसणे याकडे ते जाणीवपूर्वक लक्ष देतात.

'माझ्यात काहीतरी वैशिष्ट्यपूर्ण आहे, मला इतरांनी विशिष्ट भूमिकेतून ओळखावे' असे त्यांना वाटत असते. आत्मविश्वासाने एखादी कृती करणे, नेतृत्व, सहकार्य, चिकाटी हे गुणही विशेषत्वाने वाढीस लागतात. सामाजिक, राजकीय, जागतिक विषयांवर ते चर्चा करतात. अन्यायाविरुद्ध लढा देण्याची तयारी असते. ते समाजमान्य वर्तनाकडेही लक्ष देतात. जबाबदारीने काम करण्याची जिद्द त्यांच्यात असते. आदर्शाच्या शोधात असल्याने कोणाचातरी 'आदर्श' त्यांच्या आचार-विचारात दिसतो. विविध क्षेत्रांत विकास झाल्याने भावी जीवनाची तयारी ते या अवस्थेत करीत असतात.

## (क) भारतीय समाजातील कुमारावस्थेच्या समस्या व गरजा

**(Problems and Needs of Adolesence in Indian Context)**

मानवी अवस्थांतरातील अत्यंत महत्त्वपूर्ण अवस्था म्हणजे कुमारावस्था होय. बहुतेक शारीरिक, मानसिक व बौद्धिक बदल या कालखंडात घडत असतात. व्यक्तिमत्त्वाला नवीन वळण देण्याचा हा कालखंड होय. याच काळात कुमारांच्या अनेक समस्या निर्माण होत असतात. त्यांच्या गरजाही विविध पद्धतींच्या असतात. त्यांच्या सुयोग्य विकासासाठी व उज्ज्वल भविष्यासाठी त्यांच्या गरजा व समस्यांचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

कुमारावस्थेतील परिपक्वतेमुळे त्याच्या गरजा प्रबळ झालेल्या असतात. शारीरिक गरजांबरोबर मानसिक, भावनिक, सामाजिक गरजा वाढत जातात. गरजांची पूर्तता न झाल्यास समस्या निर्माण होतात. या समस्यांमुळे त्यांच्यात विषमायोजनाची अनेक लक्षणे उद्भवतात. शारीरिक समस्यांबाबत वागणे, बोलणे, भाषा यात सुसूत्रता नसणे, वैयक्तिक काळजी न घेणे थकवा, कुपोषण वगैरे लक्षणे त्यांच्यात दिसतात. मानसशास्त्रीयदृष्ट्या स्वयंविरोध-स्वतःला दोष देणे, उदासीनता, काळजी करणे, सतत बोलत राहणे इ. गोष्टी लक्षात येतात.

समस्याग्रस्त विद्यार्थ्यांची शारीरिक, मानसिक, भावनिक वाढ व विकास होण्यासाठी शिक्षकांनी, पालकांनी योग्य काळजी घेतली पाहिजे. कुमाराच्या कोणत्या समस्या आहेत त्या समजण्यासाठी त्यांच्याशी आंतरक्रियायुक्त मित्रत्वाचे संबंध ठेवले पाहिजेत. वर्गातील व

वर्गाबाहेरील उपक्रमास प्रोत्साहन दिले पाहिजे. वेळप्रसंगी स्मित करणे, [illegible] देणे इत्यादी कृती शिक्षकांकडून व्हाव्यात. मुलांची निर्भत्सना गुणावगुणाचे स्पष्टीकरण त्यांना देऊ नये. त्यांना समजावून घेऊन त्यांच्या समस्या दूर कराव्यात.

कुमारावस्थेतील मुलांच्या आर्थिक समस्याही असतात. समूह, गट, सोबती यांचा दर्जा असेल तसे वागण्याचा ते प्रयत्न करतात. या वयातील मुले संवेदनशील असल्याने पालकांबद्दल नाराजी व्यक्त होते. पालकही विश्वासाचा अभाव दर्शवितात. त्यामुळे पालक आणि कुमार यांच्यात दरी निर्माण होण्याची शक्यता असते. पालकांनी आपल्या पाल्याशी मित्रत्वाच्या नात्याने वागले पाहिजे. परिस्थितीची जाणीव त्यांना करून दिली पाहिजे.

ह्या वयात एकलकोंडेपणाने वागणाऱ्या मुलांच्या सवयीचे मूळ त्यांच्या घरात व पालकांच्या परस्परसंबंधातही असू शकते. मुलांच्या या समस्या दूर करण्यासाठी विद्यार्थ्यांच्या पालकांचे सहकार्य घेऊन त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करावा. पालकांनी पाल्यांच्या रामवेत विविध प्रकारचे उपक्रम आयोजित करावेत.

अभ्यासासंबंधीच्या समस्याही विद्यार्थ्यांना भेडसावीत असतात. अभ्यासातील कमी प्रगती, विषय न समजणे इत्यादी त्यांच्या समस्या असतात. त्या सोडविण्यासाठी विद्यार्थ्यांला केंद्रबिंदू मानून शिक्षकांनी त्यासाठी प्रश्नोत्तरे, चर्चा, प्रकल्प पद्धतीचा वापर करावा. त्यासाठी शाळेबाहेरील तज्ज्ञ, अनुभवी शिक्षक, हुशार कुशाग्र मुले यांची मदत घ्यावी. वाचनालयाचा पुरेपूर उपयोग विद्यार्थ्यांना होईल अशी शिक्षकांनी व्यवस्था करावी. निरनिराळ्या विषयांची माहिती होण्यासाठी विविध व्यवसायांत काम करणाऱ्या व्यवसायांशी संपर्क असणाऱ्या मार्गदर्शनपर व्यक्तींना - पालकांना निमंत्रित करावे त्यामुळे अभ्यासविषयातील त्यांच्या बऱ्याचशा समस्या दूर होतील.

बौद्धिक विकास व्यवस्थित होण्यासाठी पालक व शिक्षक यांच्या शिक्षकांच्या सहकार्याची गरज आहे. त्यासाठी बालकाच्या समस्यांचा शोध घेऊन त्याचे समाधान करणे आवश्यक ठरते. उदा. एखादा मुलगा नापास झाला तर पालकांनी त्याला न रागावता तो का नापास झाला हे जाणून घेऊन त्याला पुन्हा नव्या जोमाने परीक्षेस बसण्यास प्रवृत्त करावे नाहीतर नापास होण्याचा त्याच्यावर विपरीत परिणाम होईल.

शिक्षक, पालक व मित्र यांचाही कुमारांवर प्रभाव पडत असतो. ह्यांचा आदर्श चांगला असेल तर तो आपल्या भावनांवर विजय मिळवितो. शिक्षक चारित्र्यहीन असेल तर त्याच्यापुढे प्रचंड समस्या उभ्या राहतात. त्याच्या आदर्शाला तडे जातात. जॉन ड्युई यांच्या मते, ''कुमारावस्थेतील मुलांच्या समस्यांवर मात करण्यासाठी शाळेचे वातावरण पोषक असणे आवश्यक आहे.''

कुमारावस्थेतील महत्त्वाची समस्या म्हणजे लैंगिक समस्या होय. कुमारावस्था हा लैंगिक बदलाचा काळ असतो. सुरुवातीच्या १० ते १५ वर्षांत शारीरिक विकास होतो. त्यामुळे समाज त्यांना 'मोठा' समजतो. या काळात तरुणांच्या मनात अंतर्द्वंद्व भरलेले असते. बाल्यावस्था अशक्य कार्य शक्य करण्याची इच्छा असते. ते इतर साधनांद्वारे लैंगिक सुख मिळविण्याचा प्रयत्न करतात. विरुद्ध लिंगाच्या व्यक्तीशी संबंध, हावभाव, फोन, पत्र इतर मार्गांनी ते अश्लील माहिती मिळवित असतात. ब्लू फिल्म, अश्लिल पुस्तके, चुकीची विकृत स्वरूपाची माहिती बाहेरून मिळविण्याचा ते प्रयत्न करतात. ते कुमार्गाला वळणार नाहीत यासाठी पालकांनी व शिक्षकांनी त्यांना 'लैंगिक जीवनासंबंधी' मार्गदर्शन करावे. शाळेत लैंगिक शिक्षण द्यावे. तज्ज्ञ शिक्षक, मार्गदर्शक, समुपदेशक यांच्याकरवी योग्य माहिती द्यावी.

भारतीय संस्कृतीचा विचार केला तर पालक व मुले लैंगिकतेच्या विषयावर मनमोकळेपणाने चर्चा करीत नाहीत. पालकांनी लैंगिक शिक्षण देऊन त्याबाबतचा गैरसमज दूर करायला हवा. यामुळे ते सामान्य जीवन जगून आपले वर्तमान आणि भविष्यकाळ यशस्वीरित्या सुरक्षितपणे जगू शकतील. आई-वडिलांनी मुलांशी मित्रवत व्यवहार करावा. यामुळे ते निर्भयतेने सर्व समस्यांचे समाधान मिळवू शकतील.

पालकांकडून जिव्हाळा, प्रेम, सुरक्षितता त्यांना अपेक्षित असते. शिक्षकांनी व पालकांनी त्यांना समजावून घेण्याचा प्रयत्न केला तर पालक व मुले त्यांच्यातील दरी कमी होईल.

कुमारावस्थेतील महत्त्वाची समस्या गुन्हेगारीकडे वळण्याची आहे. शिक्षक, पालक व समाज यांनी समजावून न घेतल्यामुळे स्वैराचार, अतिलाड, अतिपैशाचा हव्यास यामुळे अनेक कुमार वाममार्गाला लागतात. पालक व शिक्षक यांनी समाजाच्या कल्याणासाठी त्यांना योग्य मार्गावर आणण्याचा प्रयत्न करावा. तज्ज्ञ शिक्षक, लैंगिक तज्ज्ञ व्यक्ती, अनुभवी शिक्षक या सर्वांच्या अनुभवाने शिक्षकांनी योग्य माहिती कुमारांना द्यावी. त्यांना सुज्ञ करावे. चारित्र्यसंपन्न पिढी घडविणे हे प्रत्येक पालकाचे व शिक्षकाचे कर्तव्य आहे हे पालक व शिक्षकांनी ध्यानात घ्यावे.

## (ड) कुमारांना सल्ला व मार्गदर्शन करण्यामध्ये शिक्षकाची भूमिका
## (Role of Teacher in Guidance and Counselling to Adolscents)

शालेय जीवनाचा अविभाज्य भाग म्हणजे कुमारावस्थेतील व्यक्ती हा आहे. कुमारावस्थेचा फार मोठा कालखंड शालेय जीवनात व्यतीत होतो. कुमारावस्थेचा कालखंड व्यक्तीच्या जीवनात अत्यंत महत्त्वाचा समजला जातो. हा कालखंड संक्रमणाचा आहे. आई-वडील, शिक्षक इ. प्रौढ व्यक्तींचे मार्गदर्शन व त्यांच्यावरील परावलंबित्व यापासून स्वावलंबन व स्वयंनिर्णय अशा प्रकारचे हे संक्रमण असते. सामान्यतः व्यक्तीचा १३ वर्षांपासून ते १९-२१ वर्षांपर्यंतचा कालखंड पौगंडावस्था/कुमारावस्था म्हणून संबोधला जातो. कुमारावस्थेचा कालखंड हा परिवर्तनाचा कालखंड होय. शारीरिक, मानसिक, वर्तनात्मक अशा विविध प्रकारची परिवर्तने या कालखंडात घडतात. शारीरिक वाढीबरोबरच या वयात लैंगिक वैशिष्ट्यांचा विकास होऊ लागतो. लैंगिक परिपक्वता हे या वयाचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य

होय. या वयात मानसिक परिपक्वतासुद्धा प्राप्त होते. भावनात्मक, बौद्धिक आणि सामाजिक परिपक्वता या वयात प्राप्त होतात.

थोडक्यात असे म्हणता येईल की, बाल्य व तारुण्य यांच्यामधील संक्रमणाचा काळ हा कुमारावस्थेचा काळ होय. बाल्य संपत आलेले असते आणि तारुण्यात पदार्पण व्हावयाचे असते असा हा कालखंड असतो. विविध प्रकारची परिवर्तने हे या कालखंडाचे वैशिष्ट्य होय. या कालखंडात होणारे हे बदल अत्यंत महत्त्वाचे असतात. या बदलाची जाणीव किशोरांना होऊ लागते आणि त्यामुळे आपण कोणीतरी वेगळे आहोत असे त्यांना वाटते. त्यामुळे त्यांच्या मनात गोंधळ निर्माण होऊन मनावर ताण येतो. म्हणूनच या कालखंडाचे वर्णन 'वादळ व तणाव' यांचा कालखंड असे केले जाते.

अशा प्रकारे कुमारावस्था 'समस्यांचे वय' म्हणून सर्वमान्य झाले आहे. त्याबरोबरच कुमारावस्थेचा फार मोठा कालखंड शालेय जीवनात व्यतीत होतो. म्हणून या मुलांना योग्य सल्ला व मार्गदर्शन करण्याची महत्त्वपूर्ण भूमिका शिक्षकांना पार पाडावी लागते. या कालखंडातील मार्गदर्शनच त्या मुलांचे भविष्य घडवित असते. अनेक वेळा या कालखंडातील उद्‌भवणाऱ्या समस्येविषयी शिक्षकांकडून अथवा कुटुंबातील घटकांकडून सल्ला व मार्गदर्शन मिळत नाही. त्यामुळे ही मुले गुन्हेगारीकडे वळतात आणि समाजविरोधी वर्तन करतात.

## विचारविनिमयात्मक सल्ला व मार्गदर्शन करण्याच्या पद्धती

मार्गदर्शन ही सतत चालणारी प्रक्रिया असून तिच्यामुळे व्यक्तीस आपल्या कुवतीचा अंदाज घेऊन स्वहितासाठी व समाजहितासाठी योग्य ते बदल करून विकास साधता येतो. मार्गदर्शन आणि सल्ला अथवा समुपदेशन याचा मथितार्थ असा आहे की त्याचा अंतिम हेतू व्यक्ती तसेच समाजाचे हित आहे. शिकविणे म्हणजे हा हेतू साध्य होण्यासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे होय. शिक्षणात अशा शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन केले पाहिजे की त्यामुळे विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या सर्व गुणांचा जास्तीत जास्त विकास होईल आणि अशी विकसित व्यक्तीच समाजाचे हित व समाजोन्नती साधू शकते.

जोन्स या तज्ज्ञाने मार्गदर्शनाच्या तीन पद्धती सांगितलेल्या आहेत.

१. **विचारविनिमयात्मक सल्ला** (Counselling) : या पद्धतीत दोन व्यक्तींचा संबंध अभिप्रेत आहे. एक व्यक्ती सल्ला देणारी व दुसरी सल्ला घेणारी असते. विचारविनिमयात्मक पद्धती ही सामूहिक नसून वैयक्तिक असते. या पद्धतीत एकत्र विचार करून मतांची देवाण-घेवाण केली जाते. सल्ला देणाऱ्या व्यक्तीने केवळ एखादे व्याख्यान देणे किंवा उपदेश करणे म्हणजे या पद्धतीचा अवलंब करणे नव्हे. सल्ला देणारी व्यक्ती कुशलतापूर्वक प्रश्न विचारून समस्येचे स्वरूप लक्षात घेते व लक्षणे समजावून घेऊन सल्ला देते.

२. **सामूहिक मार्गदर्शन** (Group Guidance) : निरनिराळे शिक्षणक्रम व व्यवसाय याविषयीची सर्वसामान्य माहिती देण्यासाठी या पद्धतीचा फार उपयोग होतो. अभ्यासक्रम व [illegible] विद्यार्थ्यांमध्ये योग्य वेळी आला पाहिजे. यासाठी सामूहिक



मार्गदर्शन उपयुक्त ठरते, सामूहिक मार्गदर्शनानंतर विद्यार्थ्यांना प्रश्न विचारण्याची संधी दिली जाते आणि त्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे दिली जातात. सामूहिक मार्गदर्शन शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक, व्यावसायिक, वैयक्तिक इ. विविध प्रकारच्या समस्या असलेले असते.

३. **उपचारात्मक पद्धती** (Clinical Method) : व्यक्तीच्या समस्यांचे चोख निदान करून त्याबाबत उपचार करण्याची ही शास्त्रशुद्ध पद्धती आहे. शिक्षक, डॉक्टर, मानसोपचार तज्ज्ञ हे या पद्धतीचा अवलंब करून समस्यांमागील कारणे समजावून घेऊन समस्येचे निराकरण करू शकतात.

## कुमारावस्थेतील समस्या

कुमारावस्था 'समस्यांचे वय' म्हणून सर्वमान्य झाली आहे. कुमारांच्या जीवनातील समस्यांचा अभ्यास सुरुवातीला जी. स्टॅन्ले हॉल या शास्त्रज्ञाने कुमारांच्या दैनंदिनीवरून केला. लेकॉक या शास्त्रज्ञाने कुमारावस्थेतील समस्यांचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे केले आहे.

१. शारीरिक वाढ व ऐहिक विकासाच्या बदलाशी समायोजन.

२. आई-वडिलांवरील अतिरिक्त भावनात्मक परावलंबित्वापासून मुक्तता व कुटुंबापासून दुरावणे.

३. स्वतःची वैशिष्ट्यपूर्ण लैंगिक भूमिका मान्य करून विरुद्धलिंगी व्यक्तीशी समायोजन करणें.

४. योग्य व्यवसाय शोधणे व त्यात शिरकाव करणे.

५. जीवनाला हेतू व अर्थ देणारे तत्त्वज्ञान घडविणे.

## कुमारावस्थेतील समस्येबाबत मार्गदर्शन व सल्ला : शिक्षकांची भूमिका

काही शास्त्रज्ञ कुमार समस्यांचे वर्गीकरण पूर्व कुमारवयातील समस्या व उत्तर कुमार वयातील समस्या अशा प्रकारे करतात. पूर्व कुमारवयात मुलांना प्रामुख्याने शाळेचा अभ्यास, पालकांशी कुमाराचे संबंध व शिक्षक आणि सम व विरुद्धलिंगी व्यक्तींशी असणारे त्याचे संबंध, व्यवसाय निवड, व्यक्तिगत समायोजन, पैशाची अडचण इ. समस्या भेडसावत. याउलट, उत्तर कुमारावस्थेतील समस्यांत प्रामुख्याने महाविद्यालयीन अभ्यास, व्यवसाय निवड, वैयक्तिक समायोजन, कौटुंबिक संबंध यांचा समावेश होतो.

कुमारावस्थेत विविध प्रकारचे शारीरिक व मानसिक बदल घडून येतात. कुमारांना मी लहान राहिलो नाही असे वाटते. परंतु त्यांचे पालक लहान समजून त्याच्याकडून त्या वयाला साजेशा वर्तनाची अपेक्षा करतात. म्हणूनच नवीन पिढी आणि जुनी पिढी यांत संघर्ष निर्माण होतो. अशा वेळी शिक्षक त्यांना मार्गदर्शन करू शकतो. त्यामुळे शारीरिक व मानसिक बदलाशी कुमार योग्य समायोजन साधू शकतात. तसेच कुमारवयात लैंगिक विषयासंबंधी ज्ञानाला फारच महत्त्व असते. त्या वेळीही शिक्षकच लैंगिक शिक्षण देऊ शकतो. लैंगिक प्रेरणेसंबंधीची माहिती कुमार मुला-मुलींना न दिल्यामुळे त्यांच्यात लैंगिक समस्या निर्माण होतात. म्हणून कुमारांच्या लैंगिक समस्या निराकरणात शिक्षक महत्त्वाची भूमिका पार पाड